# जाहीर नोटीस

## रत्नागिरी येथील जिल्हा न्यायालयात

या जाहीर नोटीशीद्वारे असे कळविण्यात येते की, .....

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी तसेच त्यांचे अधिपत्याखालील तालुका न्यायालयांमध्ये येथील अधिकारी, कर्मचारी व पक्षकार वर्ग यांचे 'कोरोना' या विषाणूपासून संरक्षण करणेकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून प्रत्येक न्यायालयाच्या प्रवेशद्वारावर इन्फ्रारेड टेम्परेचर गन्स, सॅनिटायझर, हॅण्डवॉश, बेसीन्स, सेन्सर ऑपरेटर फॉसिट्स, स्प्रेअर(मोटार बेस्ड), डिसइन्फेक्टंट स्प्रे, मास्क, हॅण्ड लिक्वीड सोप, हॅण्डग्लोव्हज् इत्यादी साहित्य उधारीने खरेदी करणेकरता दिनांक २१/०५/२०२० रोजीचे जाहिर नोटीसीद्वारे दरपत्रके मागविणेत आली होती. सदर जाहिर नोटीसीद्वारे दरपत्रके मागविणेचा अंतिम दिनांक २८/०५/२०२० रोजीपर्यंत ठेवणेत आला होता. तथापि सदर दरपत्रके मागविणेचा अंतिम दिनांक ०२/०६/२०२० पर्यंत याद्वारे वाढविणेत येत आहे. तरी सदर आवश्यक वस्तूंची यादी खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | वस्तुचे नांव | वस्तूंची संख्या |
|---|---|---|
| १ | इन्फ्रारेड टेम्परेचर गन्स | १२ |
| २ | सॅनिटायझर | १५० लि. |
| ३ | हॅण्डवॉश लिक्वीड सोप | १५० लि. |
| ४ | बेसीन्स | १५ |
| ५ | सेन्सर ऑपरेटर फॉसिट्स(नळ) | १५ |
| ६ | मास्क | १००० |
| ७ | हॅण्डग्लोव्हज् | ५२५ जोडी |
| ८ | लिक्वीड सोप डिस्पेंसर | २५ |
| ९ | हॅण्ड सॅनिटायझर डिस्पेंसर स्टॅण्ड | २५ |
| १० | डिसइन्फेक्टंट स्प्रे | १०० |
| ११ | स्प्रेअर(मोटर बेस्ड) | १० |

तरी ज्या कोणाला वर नमूद केलेप्रमाणे जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथे 'कोरोना' या विषाणूपासून संरक्षण करणेकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून प्रत्येक न्यायालयाच्या प्रवेशद्वारावर इन्फ्रारेड टेम्परेचर गन्स, सॅनिटायझर, हॅण्डवॉश, बेसीन्स, सेन्सर ऑपरेटर फॉसिट्स, स्प्रेअर(मोटार बेस्ड), डिसइन्फेक्टंट स्प्रे, मास्क, हॅण्ड लिक्वीड सोप, हॅण्डग्लोव्हज् इत्यादी

साहित्य उधारीने योग्य दरात पुरविणे शक्य असेल त्यांनी खालील अटी व शर्तीस अधिन राहून पुढील चार दिवसांचे आत म्हणजेच दिनांक ०२/०६/२०२० पर्यंत जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथे समक्ष अथवा पोस्टाद्वारे/ कुरिअर द्वारे पाठविणेत यावीत.

## दरपत्रकाबाबत अटी व शर्ती

१. दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशीलासह तारखेसहीत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे नावे असावे .

२. दरपत्रक बंद लखोटयातून असावी व लखोटा मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश रत्नागिरी यांचे नावे नमूद असावा.

३. जाहीर नोटीस मधील दिलेल्या तारखेनंतर आलेली दरपत्रक विचारात घेतली जाणार नाही.

४. सर्वांत कमीत कमी दराची निविदा ज्यांची असेल त्यांची दरपत्रक विचारात घेणेत येईल. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

५. पुरविणेत आलेले साहित्य हे चांगल्या स्थितीत असणे आवश्यक आहेत, काही त्रुटी निघाल्यास ते नव्याने पुरविणे आवश्यक आहे.

६. अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचा राहील.

आज दि. २९/०५/२०२० रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

COURT OF RATNAGIRI

दिनांक — २९/०५/२०२०

प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी